# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.

२३ ऑगस्ट, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

: 7447744100 (PRO)

# सावली पोलीसांची अवैध दारू तस्करांविरूध्द कार्यवाही

## १५ लक्ष १० हजाराचा मुद्देमाल हस्तगत

दिनांक २३/०८/२०२० रोजी सावली पोलीस स्टेशन येथील पोलीस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, काही इसम एका चारचाकी वाहनाने हरनघाट मार्गे दारूची तस्करी करणार आहे. अशा माहितीवरून सावली पोलीसांनी तात्काळ हरनघाट मार्गावर सुरू असलेल्या नाकेबंदी दरम्यान वाहनांची तपासणी केली. दरम्यान मिळालेल्या माहितीप्रमाणेएक बोलेरो पिक अप वाहन येतांना दिसले सदर वाहनास थांबवुन वाहन ताब्यात घेवुन वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये एक विशेष कप्पा तयार करून त्यामध्ये ७० बॉक्स देशी दारू किं. ७,००,०००/—रू चा माल मिळुन आला. सदर दारूचा माल आणि बोलेरो पिक अप वाहन क्र. एम एच ४९ टीए १५१२ किं. ८,००,०००/—रू आणि एक मोबाईल फोन किं. १०,०००/—रू असा एकुण १५,१०,०००/—रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन सावली येथे अप.क्र. १९०/२०२० अन्वये नोंद करण्यात आला असुन गुन्हयाच्या तपास आणि आरोपीचा शोध सुरू आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडडी आणि सहायक पोलीस अधीक्षक श्री. अनुज तारे यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरिक्षक श्री. कुमारसिंग राठोड यांचेसह पोहवा. चंद्रकांत कन्नाके, पोशि. सुमित मेश्राम, दिपक डोंगरे, मपोशि. प्रिती आलम यांनी पार पाडली.

———————————————————————————————————